# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०४/२०२६ (शुक्रवार )

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ४० लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक १०/०४/२०२६ रोजी श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी ,कन्हान हे त्यांच्या पथकांसह कन्हान उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना कुही फाटा, वडोदा येथे एक ट्रक क्रमांक एम एच ४० सी वाय ७७७० हे मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक निखील सुरेश निपाणे, वय २९ वर्षे आणि क्लिनर आरोपी नामे सुमित महेश मेश्राम, वय २१ वर्षे , दोघे रा. रा. गांधी वार्ड, मोहाडी ता. मोहाडी जि भंडारा हे मिळुन आले.** आरोपींना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष एक ट्रक क्रमांक एम एच ४० सी वाय ७७७० किंमती ४०,००,०००/— रूपये आणि ९ ब्रास रेती किंमती ४५,०००/— रूपये असा एकुण किमती ४०,४५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




# पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत
# दुकान फोडणाऱ्या पाहीजे आरोपीला १२ तासात अटक
# स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कोंढाळी :— **कोंढाळी पोलीसांनी रात्रगस्ती दरम्यान** दिनांक ०९/०४/२०२६ रोजी दुधाळा येथील एका पानठेल्याचा कुलुप तोडून चोरी करून जात असतांना दोन विधीसंघर्ष ग्रस्त बालकाला ताब्यात घेतले होते. त्यावेळी एक आरोपी अंधाराचा फायदा पळुन गेला होता. विधीसंघर्षग्रस्त बालकांनी सदर गुन्हयात आरोपी नामे **पंकज मोहन बांगरे, वय २२ वर्षे, रा. सुकळी, ता. हिंगणा** हा त्यांच्या सोबत गुन्हयात सहभागी असल्याची माहीती दिली होती. सदर आरोपी हा पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथील

अभिलेखावरील आरोपी असुन तो सध्या नागपुर जिल्हयातुन हद्दपार असल्याची माहीती पोलीसांना समजली. कोंढाळी पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर तपासादरम्यान दिनांक १०/०४/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचुन सदर गुन्ह्यातील पाहीजे आरोपी **पंकज मोहन बांगरे, वय २२ वर्षे, रा. सुकळी, ता. हिंगणा याचा अवघ्या १२ तासात शोध घेवुन त्याला बाजारगाव येथुन ताब्यात घेतले.** तसेच सदर आरोपीला नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले असतांना सुध्दा त्यांनी कोणतीही पुर्वपरवानगी न घेता नागपुर जिल्हयात प्रवेश करून अदेशाचे उल्लंघन केल्याबाबत त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम १४२ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## बनावट जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणात आणखी ३ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— पोलीस स्टेशन पाचगाव अंतर्गत गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, सालई गोधनी, जि. नागपूर येथील काही संबंधित व्यक्तींनी बनावट प्रमाणपत्र तयार केल्या प्रकरणी दिनांक २८/०३/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम ३१८(४),३३८, ३३६(३),३४०(२),३(५) भा. न्या. सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पाचगाव पोलीसांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सदर प्रकरणाचा जलद गतीने तपास करून दिनांक ०९/०४/२०२६ रोजी एका विदयार्थीनीसह आरोपी क्रं १) मुकेश बिसनदेव चौबे, वय ४५ वर्ष ,रा. सबीना सोसायटी, प्लॉट नं. ३५,**

**गोरेवाडा, नागपुर आणि २) जगन्नाथ रामा शेरकुरे, वय २२ वर्ष ,रा. तास, ता. भिवापूर जि. नागपुर यांना अटक केली . दिनांक ०९/०४/२०२६ रोजी रात्री सदर गुन्हयात पाचगाव पोलसांनी १) अमोल देविदास घोडे, वय ३४ वर्षे, रा. प्लॉट नं. १०७ पवार नगर हुडकेश्वर नागपुर मुळ पत्ता सुसुद्रा पो. मानिकवाडा, ति. कारंजा घाडगे, जि. वर्धा, २) शुभम बालाजी खोरगडे, वय ४१ वर्षे,रा. प्लॉट नं. २०७ महालक्ष्मी नगर, मानेवाडा रोड, लाडीकर ले आऊट, नागपुर, ३) रितेश मधुसुदन सहारे, वय ४२ वर्ष, रा. शिवानी अपार्टमेंट २ प्लॅट नं. २०१ मनिष नगर, नागपुर यांना अटक केली आहे. सदर प्रकरणात पोलीस साखळी पुरावे जोडुन सखोल तपास करीत आहेत.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ४ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. १ लाख १९ हजार ७३५ रूपयांचा मुद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०९/०४/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मसोरा येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे **१) सुरेश उपासराव शेंबेकर वय ५२ वर्ष, रा. मसोरा ता नरखेड, २) चंद्रभान गुलाबराव गायधने, वय ५७ वर्षे, रा. मसोरा ता नरखेड,३) पुरूषोत्तम रधुजी गायधने, वय ५६ वर्षे , रा. मसोरा ता नरखेड, ४) रविद्रं धनराजजी वाडबुदे, वय ४८ वर्षे, रा. मसोरा ता नरखेड,** यांना पोलीसांनी जागीच ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना पकडले.

पोलीसांनी पंचासमक्ष १) होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम एच ४० डी बी ०३९७ २) होंडा शाईन मोटार सायकल क्र एम एच ३१ डी जे ८१३४ ३) रोख रक्कम ४६५५/—रूपये ४) ताशपत्ते आणि इतर साहीत्य असा एकुण १,१९,७३५/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# पोलीस ठाणे अरोली हद्दीतील महालगाव शेतशिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद, आरोली पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोलीः—** दिनांक १०/०४/२०२६ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा महालगाव शेत शिवारात एक इसम अवैधरित्या रनिंग भट्टी द्वारे मोहाफुल गावठी काढत आहे. मिळालेल्या माहीती च्या आधारे पोलीस पथकाने नमुद घटनास्थळी जावुन धाड टाकुन कारवाई केली असता महालगाव शेतशिवारात असलेल्या पाण्याच्या नाल्याच्या काठावर एक इसम हातभट्टी लावुन दारू गाळतांना दिसुन आला.पोलीसांनी त्या इसमास ताब्यात घेवुन त्याला नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव **गणेश पुसाराम माहुले, वय ६१ वर्षे, रा. खमारी,ता मोहाडी,जि. भंडारा** अशी माहीती प्राप्त झाली.

पोलीसांनी रनिंग भट्टी नष्ट करून आरोपीचे ताब्यातुन १०० किलोग्रॅम मोहाफुल सडवा आणि ३० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी चे साहीत्य लोखंडी जळाउ लाकुड ,पाईप आणि इतर असा एकुण ८२००/— रूपयांचा **जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**



## नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

**दिनांक ०९/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपींवर कारवाई करून ०२ गुन्हे नोंद करण्यात आले.**

**रामटेक पोलीस स्टेशन** अंतर्गत आरोपी आयुष प्रल्हाद आकरे, वय २० वर्ष,रा. शंकर आकरे पोहेवाला परसोडा ता रामटेक हा उडान पुलाखाली पंचायत समीती ऑफीसचे मागे रामटेक येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. तसेच **पोलीस स्टेशन वडोदा** अंतर्गत रूपेश शत्रुघ्न कांढारकर, वय ३५ वर्ष,रा. गुमथळा, ता. कामठी जि नागपूर हा मौजा गुमथळा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. .नमुद आरोपी हे अंमली पदार्थांच सेवन करतांना मिळुन

आल्याने त्यांच्यावर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**